नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/08/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

**अवैधरीत्या देशी दारुची**
**वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक**
**स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही**

दिनांक ११/०८/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन बेला हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे महिती मिळाली की, इंदोर कडुन चंद्रपूर रोडने गडचिरोलीला आयशर क्र. यू. पी.– १२/बी.टी. – ९३३५ ने दारूची अवैध वाहतूक होत आहे अशा माहितीवरून सदर गाडीचा पाठलाग करून गाडी पकडली असता गाडीत ४८० बॉक्स देशी दारू रॉकेट ज्यावर बॅच नंबर नसलेले किंमती १६,८०,०००/– रुपयाचा मुद्देमाल मिळून आला व आयशर गाडी किंमती २००००००/– रु. ची असा मुद्देमाल मिळून आला. चालकाजवळ इंदोर येथील Senitech project Ruturaaj business centre Indore ची TP ज्यामध्ये प्लम्बिंगचा माल असल्याबाबतची बनावट व खोटी मिळून आली. आरोपीस विचारपूस मध्ये सदर माल इंदोर येथून रिंकू राठी याने भरून दिला व सिरोंचा येथे नेत असल्याचे सांगीतले. आरोपीच्या ताब्यातून विनापरवाना व अवैधरीत्या **१) प्रत्येकी एका खाकी रंगाच्या बॉक्स मध्ये देशी दारू रॉकेट संत्रा ९० उसच्या प्लास्टिक शिशीच्या एकूण १०० निपा असा एकूण ४८० बॉक्स किंमती अंदाजे १६,८०,०००/– रू. २) आयसर गाडी क्रमांक यू. पी.– १२/बी.टी.– ९३३५ किंमती अंदाजे २०,००,०००/–रू. असा एकुण ३६,८०,०००/–** रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आले आहेत. जप्त मुद्देमाल व आरोपी यांना पुढील कायदेशीर कारवाईकरीता पोलीस स्टेशन बेला यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४६८, ४७१, १०९ भादंवि सहकलम ६५ A, E, ९० महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. विशाल आनंद सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा गायकवाड नागपूर विभाग, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशीष मोरखडे, पोलीस हवालदार मिलिंद नांदूरकर, महेश जाधव, संजय बांते, अरविंद भगत, मयूर ढेकले, साजिद सय्यद, पोलीस नायक रोहन डाखोरे, अमृत किनगे, रोषण बावणे, पोलीस शिपाई राकेश तालेवार, राहुल साबळे, चालक पोलीस शिपाई सुमित बांगडे, आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



## गैरकायदयाची मंडळी

पोस्टे सावनेरः— अंतर्गत १३ किमी अंतरावर खुमारी येथे दिनांक १०/०८/२०२३ चे ११.३० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे— १) जिवन काठवते, २) सोनु काठवते, ३) मनिषा काठवते वरील सर्व रा. खुमारी ४) पराग कडु ५) पराग कडुचे वडील ६) सरस्वती कडु वरील सर्व रा. पारडी नागपुर** यांनी फिर्यादी नामे— राजकुमार केशवराव केचे, वय ५२ वर्ष रा. वार्ड क्र. १ खुमारी ता. कळमेश्वर यांच्या घराच्या समोर रोड लगत सार्वजनिक ठिकाणी बांधकाम करित असता फिर्यादीने गड्डा खोदण्यास मनाई केली असता यातील आरोपीतांनी जमाव गोळा करून संगनमत करून अश्लील भाषेत शिवीगाळी करून फिर्यादीची मारूती ८०० कारच्या समोरील काच हाताने फोडुन नुकसान केले व २४ तासात पुन्हा पाहुन घेण्याची अशी व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, २९४, ४२७, ५०६ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेंद्र यादव ब. नं १६३९ पोस्टे सावनेर मो. नं. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर